<u>**अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक ३ याची जबानी सत्यप्रतिज्ञेवर सुरु.**</u>

मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.१०३/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१२६/२०१६
आश्वीनी वि. राजु
निशाणी क्रमांक ४१

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव– निलेश अनिल गोधाने

वय– ३२ वर्ष, व्यवसाय– नोकरी

राहणार– अकोला, ता.जि.अकोला

<u>**पुढील सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. परमार यांचेमार्फत शपथेवर सुरु...**</u>

१. सन २०१५ पॅरागॉन इरिगेशन मध्ये एरिया मॅनेजर या पदावर काम करतो. पुर्वी कंपनीचे नाव पॅरेगॉन सिंथेटीक ॲण्ड पॉलीमर्स लि. असे होते. मला या प्रकरणामध्ये साक्ष देण्यासाठी प्राधीकृत करण्यात आले आहे. मी आज रोजी ओळखपत्र, कंपनीचे अधिकारपत्र आणले आहे. मुळ ओळखपत्राची साक्षांकीत प्रत आणि अधिकारपत्र आता मला दाखविले तेच असुन ते **निशाणी क्र.४४ वर आणि ४५** वर आहे. मयत बाळकृष्ण तायडे यांना मी कॉलेजपासुन ओळखत होतो. पॅरेगॉन सिंथेटीक ॲण्ड पॉलीमर्स लि. ते सेल्स इंजिनियर म्हणुन काम करीत होते. कंपनीमध्ये त्यांची नियुक्ती कायम स्वरुपाची होती. ऑगस्ट २०१५ ते ऑक्टोबर २०१५ दरम्यानचे त्यांचे पगारपत्रक मी दाखल करीत आहे. त्यावर माझी सही आहे. त्यावरील मजकुर बरोबर आहे. तो **नि.क्र.४६ ते ४८** वर आहे. त्यावेळी त्यांना १४५००/– एवढा पगार होता. कंपनी त्यांच्या पगारातुन आयकर वजा करत असे. त्याबद्दल फॉर्म क्र.१६ कंपनी भरत असे. आता दाखवण्यात आलेला फॉर्म नं.१६ ची साक्षांकीत प्रत आहे. त्यावर साक्षांकीत म्हणुन माझी सही आहे. फॉर्म १६ हा आयकर विभागाच्या पोर्टलवर मिळुन येतो. त्यामधील मजकुर बरोबर आहे.

(गैरअर्जदार क्र.२ तर्फे हरकत घेण्यात आली की फॉर्म नं.१६ वरील मुळ सही ही या साक्षीदाराची नाही. परंतु सदर साक्षीदार हा ज्या कंपनीच्या प्राधिका–याने फॉर्म नं.१६ वर सही केली आहे त्याचा अधिकृत व्यक्ती असल्याने आणि ती सही ओळखत असल्याने सदर दस्तास पुराव्यात सामील करण्यात येत आहे)

२. सदर फॉर्म नं.१६ ची साक्षांकीत प्रत **नि.क्र.४९** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>गैरअर्जदार क्र.१ तर्फे कोणीही हजर नसल्याने उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास– गैरअर्जदार क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. बी.बी.पांडे यांचेमार्फत सुरु...</u>**

३. कंपनीच्या डायरेक्टर्स संदर्भातील माहिती सोबत आणलेली नाही. साक्ष देण्यासंदर्भात अधिकृत उल्लेख नि.क्र.४५ मध्ये नाही. हे खरे आहे की, मयत बाळकृष्ण तायडे हे कॉलेजमधील मित्र होते. मी आज रोजी पगार नोंदवही सोबत आणली नाही. बाळकृष्ण तायडे यांचे जॉयनिंग लेटर आणले आहे पण दाखल केले नाही. हे खरे आहे की, कंपनीमध्ये कायमस्वरुपी नोकरीवर होता हे दाखवणारा दस्त या प्रकरणात दाखल नाही. ज्या मुळ दस्तावरुन सॅलरी डिटेल्स, पगार विवरणपत्र तयार करण्यात आले ते मुळ दस्त सोबत आणलेले नाही. हे खरे आहे की, ग्रुप इंशरन्स पॉलीसी काढलेली असते. बाळकृष्ण यांच्या मृत्यूनंतर आमच्या कंपनीत ग्रुप इंशुरन्स काढला जावु लागला होता. हे खरे आहे की, नि.क्र.४६ ते ४८ आमच्या कंपनीच्या डायरेक्टर्स अथवा माझ्या वरीष्ठ अधिका–यांची सही नाही. हे खरे नाही की, बाळकृष्ण हा माझा कॉलेज मित्र असल्याने त्याच्या वारसांना अधिक नुकसान भरपाई मिळावी म्हणुन मी हे दस्त दाखल केले आहे. हे खरे नाही की, मी वस्तुस्थिती लपवण्यासाठी मुळ दस्त सोबत आणले नाही. हे खरे नाही की, मी खोटे दस्त दाखल केले आणि खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.10.19 17:18:07 +0530

दिनांक : १९/१०/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.10.19 17:18:12 +0530

दिनांक : १९/१०/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.